# विषय सूची


*प्रस्तावना* ........ ix

परिचय ........ १

सत्य ........ १७

आनंद ........ २१

ना-कर्तेपणा ........ २५

प्रारब्ध ........ ३१

स्वतंत्र इच्छा ........ ३५

अद्वैत ........ ४३

अहंकार ........ ४९

विचार आणि वैचारिक पद्धत ........ ५३

अहंकारयुक्त प्रतिक्रिया आणि
(जीवशास्त्रीय) नैसर्गिक प्रतिक्रिया ........ ५७

कृतिशील मन आणि वैचारिक मन ........ ६१

साक्षात्कार ........ ६५

आत्मपरिक्षण ........ ७१

मुख्य स्त्रोताशी संलग्न राहाणे ........ ७७

प्रार्थना ........ ८१

*समारोप* ........ ८७

*आभार* ........ ९३

# प्रस्तावना

रमेश बालसेकर

जेव्हा गौतमने मला सांगितले की त्यांनी एक पुस्तिका लिहिली आहे ज्यामध्ये माझे विचार मांडले आहेत. त्यांनी मला विचारले त्यावेळी “ओहो! ज्याची बराच वेळ मी प्रतीक्षा करत होतो ते शेवटी घडलेच!” अशी माझी उत्स्फूर्त प्रतिक्रिया झाली.

ह्या विषयात गौतमला उपजतच रस होता. आमच्या सहवासाच्या सुरूवातीपासूनच मला स्पष्टपणे जाणवत होते की गौतमसाठी हे ज्ञान म्हणजे नुसती जागृति नसून पूर्णावस्थात मुक्ति होती.

तो एक व्यक्ति नसून एक मशीन (यंत्र) आहे असे त्याला सांगितले त्याबद्दल त्याला काही विशेष आश्चर्य वाटले नाही. या संदर्भात मला फार पूर्वी वाचलेली एक गोष्ट आठवली. एका बहुराष्ट्रिय कंपनीला उच्च पदस्थ व्यक्तिंची नेमणूक करावयाची होती. त्या नेमणूकीच्या कामात त्या कंपनीला कोणत्याही प्रकारचा थोडासाही गैरव्यवहार अपेक्षित नव्हता आणि ह्या नेमणूका पूर्णपणे निःपक्षपातीपणे करण्याची इच्छा होती. यासाठी त्यांनी ह्या कामाला एका खास यंत्रमानवाची योजना केली. एक इच्छूक त्याची मुलाखत एक ‘यंत्रमानव’ घेत आहे हे विसरला आणि

एका मुद्यावर उलटसुलट मते मांडताना एकदम मोठ्याने ओरडला "तू मूर्ख आहेस." यंत्रमानव उत्तरा दाखल म्हणाला "माझ्या मित्रा असे असेलही कदाचित! पण हे तुझ्या पूर्ण लक्षात असू दे कि नोकरीसाठी तुझी मुलाखत चालू आहे."

मला असे वाटते की गौतम सचदेव यांचे हे पुस्तक वाचकाला अतिशय आवडेल व मागे वळून पाहताना (परत विचार करताना) आश्चर्याने तो म्हणेल 'खरंच, म्हणजे हे पुस्तक कोण वाचत होता?'

– रमेश एस्. बालसेकर
२४ फेब्रुवारी २००८

# परिचय

मला आठवते त्याप्रमाणे फेब्रुवारी २००० मध्ये सर्व प्रथम मी रमेश बालसेकर यांचे व्याख्यान ऐकले. मला हे खरोखरच कळत नव्हते कि हे सर्व काय गौडबंगाल आहे. मला त्यांच्या श्रोत्यांच्या एका गटाकडून येवढेच माहीत पडत होते कि सर्वकाही घडते ते ईश्वराच्या इच्छेप्रमाणेच घडते. या नंतर मी काही रविवारी तेथे जाणे चालू ठेवले हे पहाण्यास की इथे काही हुकले तर नाही नां ! आणि मी एका निष्कर्षाप्रत येऊन पोहचलो. मला याचे आश्चर्य वाटत होते की लोक हे साधे विचार ऐकण्यास वेगवेगळ्या ठिकाणाहून येथे का जमतात. एका मागोमाग एक रविवार मी तेथे जाणे चालू ठेवले आणि त्यांच्या शिक्षणातून सांगितली जाणारी काही तत्त्वे आत्मसात केली.

मला हे स्पष्टपणे जाणवत होते की माझे आयुष्य घडवणाऱ्या अशा अनेक घटना, मी काहीही करत नसताना आपोआपच घडत होत्या. मी १४ वर्षांचा असताना माझे वडील वारले. ही घटना घडली. तसेच अशा दुसऱ्या घटनेमुळे अशी परिस्थिती तयार झाली की मी २४ वर्षांचा असतानाच मला सर्व कामाचा कारभार हाती घ्यावा लागला आणि ज्यात

माझ्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या ३० कामगारांच्या गटाला मार्गदर्शन करावे लागले. अशा परिस्थितीत कंपनीमधील कामगारांनी कंपनी सोडून दुसरा धंदा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. ही परिस्थिती काही मी स्वतःहून ओढवून घेतली नव्हती तरी ती घडलीच!

मला आठवते की किशोरवयात असताना अशा अनेक ठिकाणी परिस्थितीला मी सामोरा गेलो आहे जसे की परीक्षेच्या निकालाची वाट पहाताना मी स्वतःच परत परत हे म्हणत असे.

१) काळजी करत बसण्यात काहीच तथ्य नाही – कारण जी घटना घडणारच आहे ती कितीही काळजी केली तरी घडणारच.

२) आणि जर ती घटना घडणारच नसेल तर काळजी करण्यात प्रचंड वेळ फुकट दवडण्यात काय अर्थ आहे?

अर्थात त्या वयात मनाला हे संयुक्तिक वाटले तरीपण त्याप्रमाणे माझे वायफळ बोलणे कमी झाले नाही किंबहुना वाढले व त्या दोन संयुक्तिक गोष्टी मन एखाद्या मंत्राप्रमाणे वारंवार उच्चारीत राहिले. ‘समजणे’ हे मनाव्यतिरिक्त दुसऱ्या ठिकाणी असते. कारण मन हे आपलीच शेपटी पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या कुत्र्याप्रमाणे असते. अनेक वर्षानंतर रमेश यांच्या शिकवणीशी संबंध आल्यावर ‘बौद्धिक समजणे’ व ‘अंतर्यामी समजणे’ असे जे ते सांगत असत त्या मधील फरक जाणवू लागला.

एखाद्या शिकवणीची किंमत, त्या शिकवणीमुळे एखाद्या

व्यक्तिच्या दररोजच्या वागण्यात / जीवनात / वर्तनात किती व कसा फरक होतो त्यावर अवलंबून असते. माझ्या आयुष्यात मी असे असंख्य प्रसंग अनुभवले की या शिकवणीमुळे माझ्या आयुष्यातील परिस्थितीबद्दलच्या माझ्या जाणीवांची पातळी सुसंगतपणे बदलत होती.

याबद्दलचे एखादे लहानसे उदाहरण द्यायचे तरः काही महिन्यापूर्वी परदेशातून आलेल्या माझ्या एका मैत्रिणीला तिच्या ११ वर्षांच्या मुलीसह हस्तकलेच्या वस्तूंच्या दुकानात काही खरेदी करण्यासाठी गेलो. त्या मुलीला तिच्या मित्र-मैत्रिणींसाठी बक्षीस देण्याकरता काही वस्तुंची खरेदी करायची होती. त्या मुलीच्या आईने मला आधीच सुचना केली की ती मुलगी स्वभावाने जरा चंचल आहे व लागलीच निर्णय घेऊ शकणार नाही. तिला ह्यासाठी थोडा जास्त वेळ लागू शकतो म्हणून तुम्ही न थांबता घरी गेलात तरी चालेल. आम्ही नंतर येऊ. मी मात्र तेथेच थांबण्याचा निर्णय घेतला कारण त्यांना परत घेऊन जाण्यासाठी माझी जरुरी होती. मी निरीक्षण करत होतो कि ती मुलगी कपाटाकडून काउंटरपर्यंत वारंवार येत जात होती आणि भेटवस्तु बदलत होती. यामुळे तिला आनंद न होता त्रासच होत होता हे तिच्या कपाळावर पडणाऱ्या आठ्यांमुळे मला कळत होते. कुठल्या भेटवस्तु घ्याव्या याचा तिला संभ्रम होत होता व त्याबद्दल ती निर्णय घेऊ शकत नव्हती. रमेश यांच्या म्हणण्याप्रमाणे हे अगदी स्पष्ट होते कि निर्णय न घेण्याची तिची कृति ही तिची कृति नव्हती कारण ते तिच्या जनूवर ('जीन्स'वर) अवलंबून होते. एखादी व्यक्ति निर्णय का घेऊ शकत नाही? या घटनेबद्दल राग किंवा संताप येण्याऐवजी दया येणे हे त्या घटनेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलल्यामुळे होते.

एखाद्याची प्रतिक्रिया कशी बदलते याचे मला आश्चर्य वाटले. त्या मुलीच्या अशा वागण्यामुळे मला राग येईल असे तिच्या आईला वाटून तिला त्रास होईल या कल्पनेने मी तिच्या आईला सर्व काही ठीक असल्याचे सांगितले. या तशा कमी महत्वाच्या प्रसंगामुळे एखाद्या घटनेकडे बघण्याचा दृष्टिकोन दररोज उद्‌भवणाऱ्या परिस्थितीवर कसा परिणाम घडवतो हे मला उमगले.

काही वर्षांनंतर आध्यात्मिक पुस्तके प्रकाशनाचा धंदा आम्ही सुरू केला. आकस्मिकपणे म्हणा कदाचित् ! कुंडलीनी जागृतिसंबंधी रंगीत आकृत्यांसहीत तयार केलेले माझ्या आईचे हस्तलिखीत प्रकाशित करण्यास बरेच लोक नाकारत होते. या पुस्तकाच्या प्रकाशनाची जोखीम कोणीही घेत नव्हते. म्हणून आम्हीच ते प्रकाशित करण्याचे ठरवले आणि त्यातूनच आमची प्रकाशनाची संस्था सुरू झाली. मला त्यावेळी असे वाटलेसुद्धा नव्हते कि पुढे पाच वर्षांपेक्षा जास्त ही संस्था चालेल आणि रमेश यांच्या पुस्तकांबरोबर आणखीनही काही पुस्तके आम्ही प्रकाशित करू शकू. आध्यात्मिक आणि विशिष्ट जीवन पद्धतीचे लिखाण प्रसिद्ध करणाऱ्या एका अग्रेसर दैनिक वर्तमान पत्राने माझी मुलाखत घेतली. दूरध्वनीच्या पलिकडून “भविष्यात तुमचा धंद्याचा प्लॅन काय आहे?” असा प्रश्न ऐकून मी उत्तरलो, “फक्त ते त्या परमेश्वरालाच माहीत असेल!” त्याना वाटले की हे मी विनोदाने बोललो! जेव्हा मी स्पष्टीकरण केले कि खरोखरच ते मला माहीत नाही. कारण ही संस्था प्रचलित पद्धतिप्रमाणे स्थापन झाली नव्हती. हे मी विनोदानेच म्हणतो आहे असा त्यांचा ग्रह झाल्यामुळे त्यांनी दूरध्वनी बंद केला.

माझ्या आयुष्यात घडणाऱ्या घटना व प्रसंग मी अशासाठी सांगितले की तुमच्या जीवनातील प्रमुख घटनामुळे, मार्ग बदलणाऱ्या प्रसंगांमुळे तुम्ही सध्याच्या परिस्थितीत आहात. या घटना जर घडल्या नसत्या तर तुम्ही आज आहात त्या परिस्थितीत नसता. तुम्ही तुमच्या अवतीभवती असणाऱ्या मित्रांना बघा. त्यातील बहुतांश मित्र अचानक घडलेल्या घटनामुळे तुमचे मित्र बनले नाहीत का ?

*जीवन आपोआपच घडत असते.* माझ्या पहिल्या भेटीनंतर काही महिन्यांपर्यंत रमेश हेच सांगत असल्याचे ऐकत होतो. माझ्या मते श्वास आपण घेत नाही तर तो आपोआपच घेतला जातो. यामुळे न-कर्तेपणाचा आणखीन पुढे कोणताही विचार माझ्या मनात येण्याआधीच तो विचार विरून गेला. दैववादी तत्त्वज्ञानाबद्दल मला वाटणाऱ्या शंका रमण महर्षिंच्या उपदेशानंतर माझ्या मनातून पूर्णपणे नष्ट झाल्या. महर्षि असे सांगत कि "प्रत्येकाच्या जन्माचा उद्देश तुमची इच्छा असो किंवा नसो तो पूर्ण होत असतो. उद्देशाला त्याचा त्यालाच पूर्ण होऊ द्या."

लवकरच प्रत्येक रविवारी रमेश यांना भेटण्याची ओढ व सवय मला लागली. खरे तर माझ्या दुसऱ्याच भेटीत रमेश यांनी मला सांगितले की माझी उपस्थिती ही दर रविवारी चर्चमध्ये जाण्यासारखी असू नये आणि नेमके तेच घडले पण ह्या चर्चमध्ये चेतना हाच तिथला परमेश्वर होता. प्रथम त्यांच्या सत्संगामध्ये भाग घेतला. त्याला आठ वर्षे उलटून गेली. या काळात मला त्यांची शिकवण अगदी साधी, सोपी, सुसुत्र व मुद्देसूद अशीच वाटली. जसे त्यांनी एका अलिकडच्या सत्संगात सांगितल्याप्रमाणे

‘माझ्याकडे तुमच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर असेल. कदाचित ते तुम्हाला पटणारे नसेलहि पण माझ्याकडे तुमच्या प्रश्नाला उत्तर असेल, असे कां? तर मला सुद्धा तुमच्यासारखेच प्रश्न पडले होते आणि त्यात माझ्या स्वतःच्या अनुभवावर आधारित निष्कर्षाप्रत मी पोहचलो होतो.

ते फक्त त्याच त्याच गोष्टी वारंवार वेगळ्या वेगळ्या तऱ्हेने सांगत असत तरी मी तेथे परत परत आकर्षित होऊन जात होतो. याचे मला आश्चर्य वाटत होते. याबद्दल मी जेव्हा त्यांना विचारले त्यावेळी त्यांनी मला सांगितले की जसे आवडीचे गाणे तुम्ही कंटाळा न येता वारंवार ऐकता त्याप्रमाणेच हे आहे आणि त्यांचे हे म्हणणे मला खरोखरच मनापासून पटले.

मे २००७ साली मी भारतातील एका प्रसिद्ध धार्मिक मासिकांत (लाईफ पॉझिटीव्ह) रमेशांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त एक लेख प्रसिद्ध केला होता. हा लेख वाचकांच्या पसंतीस उतरलेला पाहून मला समाधान वाटले. त्यामुळे रमेश यांनी मला सुचवले कि हा लेख लहानशा पुस्तकरुपाने छापून सर्वांना वाटावा. ही कल्पना बराच काळ दुर्लक्षित राहीली आणि अगदी अलिकडे माझ्या मनात असे विचार आले कि त्यापूर्वीच्या विचारात मी गेले आठ वर्षे जे ऐकले व जे त्यांच्या शिकवणीचे सार म्हणता येईल अशा विचारांची भर घालून पुनर्लिखाण करावे.

लगेचच मी माझा लॅपटॉप घेतला आणि आश्चर्य म्हणजे त्यांचे सर्व तत्वज्ञान या लहानशा पुस्तकात समाविष्ट करण्यात मी यशस्वी झालो. काही ठिकाणी त्यांची पुस्तके, सी.डी. / डी.व्ही.डी.

वगैरेंचा आधार घ्यावा असा विचार मी केला पण ही गोष्ट अनंत वेळेपर्यंत मनाला सतत गुंतवून ठेवणारी अशी अंत नसणारी होईल असे माझे मत झाले. म्हणून मी त्यांची फक्त एकच ऑडिओसीडी ऐकण्याचे ठरवले कि ज्यामुळे मला त्यांचा सत्संगात जो आवाज मी ऐकत होतो तो आवाज परत आठवेल. यानंतर माझ्या स्मरणात असलेले सर्व काही मला आठवले आणि ते मी लिहून ठेवले.

काही वर्षांत रमेश यांनी अधिक-उणी पन्नास पुस्तके लिहिली. यातील काही त्यांनी स्वतः आपल्या स्वहस्ताक्षरात तर काही शिष्याना भाषणातून सांगितलेल्या विचारांतील काही भाग यांचा समावेश असलेली होती.

तथापी त्यांच्या सत्संगातील कोणती गोष्ट मला भावली असेल तर ती म्हणजे त्यांनी वापरलेली अगदी साधीसोपी भाषा आणि त्यांच्या तत्त्वांचे पायरी पायरीने विश्लेषण करुन शिष्यांना ती समजवणे व एका मागोमाग येणारी सुसंगत अशी लहान लहान वाक्ये त्यांना तर्कसंगत निर्णयापर्यंत येण्यास अशा तऱ्हेने मदत करणे ही होय. त्यांच्या प्रातःकाळच्या प्रवचनाचा पुनः प्रत्ययाचा आनंद मिळावा म्हणून हिच पद्धत मी येथे वापरली आहे. या सर्वांमध्ये प्रवचनातील सत्यावरच त्यांचा जास्त भर असे.

या पुढील पानात मी हेच विषद केले आहे कि त्यामुळे वाचकाला रमेश यांच्या बरोबरच्या एखाद्या सत्संगात सांगितलेल्या शिकवणीचा अनुभव यावा.

तुम्ही त्यांच्या सर्व विचारांशी कदाचित् सहमत असाल आणि त्यामुळे तुमच्यात बदल घडेल किंवा त्यांचे काही विचार तुम्हाला पटतील व काही तुम्हाला पटणार नाहीत तरी देखील तुमची जीवनातील घटनांकडे / परिस्थितीकडे बघण्याची दृष्टि बदलू शकेल किंवा सर्वच विचारांशी तुम्ही सहमत होऊ न शकल्यामुळे हे पुस्तक खिडकीबाहेर भिरकावून द्याल. पण रमेश असे सांगतात कि यातील कोणतीही घटना घडली तरी ती एक घटना आहे आणि ती परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे व तुमच्या दैवाप्रमाणे घडत असते.

आणि शेवटी मी त्या परमेश्वराला वर स्वर्गात स्मित हास्य करत असल्याची कल्पना करतो कारण सर्व काही त्याच्या इच्छेप्रमाणे घडते असे रमेश त्यांच्या शिष्यांना नेहमी सांगत असत. ही शिकवण समाजातील सर्व थरांतील लोकांना आकर्षित करत असे – वकील, सैनिक, धर्मगुरु, उद्योगपति, नट, रोग बरे करणारे, परिचारिका, कलाकार – हे सर्वच रमेशांकडे आकर्षित होतात आणि प्रारब्धाच्या या समर्थकां-बरोबर समाधान अनुभवतात. अगदी एका आईपासून, जीचा मुलगा अपघाती मरण पावला होता ते ती मान्यच करत नव्हती आणि सहलीला गेले असताना अपघात झाल्यामुळे सहलीच्या आयोजकांना दोष देत असलेली, लढाईमध्ये शत्रुच्या सैनिकाला मारल्याचा गुन्हा तो न विसरणारा – एका जगप्रसिद्ध संगीतकाराला त्याच्या व्यवस्थापकांनी त्याच्या सर्व संपत्ती लुबाडणाऱ्या संगीतकाराप्रमाणे, असे अनेक साधक.

रमेश यांच्यात या वयातही प्रचंड उत्साह असल्यामुळे जवळ जवळ ते दोन तास त्याना भेटायाला येणाऱ्याशी बोलत असतात. एका रविवारी सकाळी ९ वाजता एका नास्तिकाने त्यांचा दरवाजा ठोठावला, आत आला आणि रमेशांच्या समोरच्या आसनावर बसला. बसता बसता “नास्तिक हा ईश्वराच्या इच्छेमुळेच नास्तिक बनतो” असे म्हटल्याचे त्यानी ऐकले. मुमुक्षु येतात, काही जण प्रश्न विचारतात आणि त्यावेळी काहीजण नुसते ऐकत बसतात. येवढ्यात जवळच्या गल्लीतून एका वाहनाचा हॉर्न वाजल्याचा आवाज खोलीमध्ये शिरला आणि परमेश्वरच त्या चालकाच्या जागी बसला आहे असे उद्गार रमेशांनी काढले.

आता जवळ जवळ ९१ व्या वर्षी नियतीचा हा पुत्र म्हणतो तो त्याच्या निजधामाला जायला तयार आहे आणि त्याच्या मागे येथे काय घडेल ह्याची त्याला पर्वा नाही. अलिकडेच त्यांनी असा टोमणा मारला होता कि “मला भूतकाळाबद्दल वाईट वाटत नाही आणि भविष्याबद्दलही काही अपेक्षा नाहीत. मला कशातच काही वाटत नाही” आणि हास्यानी खोली भरून गेली. त्यांच्याकडे येणाऱ्यांना त्यांच्या मार्फत ईश्वराची शिकवण ऐकण्यास मिळावी म्हणून त्यांच्या शरीर-प्रकृतिची काळजी जाणीवेने उत्तम तऱ्हेने घेतली आहे. परमेश्वर रमेश यांच्याशी बोलताना मला हे स्पष्ट ऐकू आले कि “माझ्या पुत्रा! हे कार्य तूं उत्तम प्रकारे केलेस.” पण नंतर मी रमेश यांना खोडकरपणे हसताना पाहिले आणि ते परमेश्वराला उद्देशून म्हणत होते, “तु काय माझी थट्टा करत आहेस का?” कारण त्यांना हे माहित आहे कि हे काम त्यांनी केलेले नाही. ते आपोआपच घडले.